जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

25 DEC 2022
सकाळ

# विद्यापीठ कर्मचारी संघ इलेव्हन फायटर्स विजयी

## (कै.) मेजर यादव ट्रॉफी क गट क्रिकेट स्पर्धा

कोल्हापूर, ता. २४ : कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशन आयोजित व यादव कुटुंबीय पुरूस्कृत (कै.) मेजर यादव टी २० क गट साखळी क्रिकेट स्पर्धेतील पहिला सामना शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघ विरुद्ध रमेश कदम किक्रेट ॲकॅडमी ब यांच्यात झाला. सामन्यात शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाने १७ धावांनी विजय मिळविला. प्रथम फलंदाजी करताना विद्यापीठ संघाने २० षटकांत सहा बाद १४१ धावा केल्या. यात विनायक शिंदे ४५, विक्रम कोंढावळे याने ३८ धावा केल्या. कदम ॲकॅडमी 'ब'कडून साईल सुतार व समर्थ दंडगे यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. उत्तरादाखल खेळताना कदम ॲकॅडमी 'ब'ने २० षटकांत नऊ बाद १२४ धावा केल्या. यात सिद्धांत सातपुते ६७, विशाल कांबळे १६ व प्रणव काटकर याने नाबाद १० धावा केल्या. विद्यापीठ संघाकडून विनायक शिंदेने तीन, अजय आयरेकरने दोन, विशांत भोसले व विश्वनाथ वरुटे यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

दुसरा सामना रमेश कदम क्रिकेट ॲकॅडमी क विरुद्ध इलेव्हन फायटर्स यांच्यात झाला. सामन्यात इलेव्हन फायटर्सने पाच विकेटनी विजय मिळविला. प्रथम फलंदाजी करताना कदम ॲकॅडमी 'क'ने २० षटकांत आठ बाद १५८ धावा केल्या. यात आदित्य घाटगे ३३, दर्पण गुंदेशा व वसीम मुल्लाणी प्रत्येकी २५, तमील अरसाण याने नाबाद १७ धावा केल्या. इलेव्हन फायटर्सकडून देवराज नाईक तीन, जितू गायकवाड दोन, जाफर शेख व तौसीफ शेख यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. उत्तरादाखल खेळताना इलेव्हन फायटर्सने १८.५ षटकांत पाच बाद १६० धावा केल्या. यात सुंदीप करबंळकर व जितू गायकवाड प्रत्येकी ३०, देवराज नाईक नाबाद २८, चेतन सुतार २७ व महेंद्र पाटील याने १७ धावा केल्या. कदम ॲकॅडमी 'क'कडून नीलेश चव्हाण तीन, रोहन सावंत व विश्वजित कावले यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

सकाळ



कोल्हापूर : तलवारबाजी स्पर्धेतील पुरुष उपविजेता व तृतीय क्रमांकप्राप्त महिलांचा संघ.

# शिवाजी विद्यापीठ रनर अप चॅम्पियन




**कोल्हापूर, ता. २४ :** जम्मू विद्यापीठ, जम्मू येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ तलवारबाजी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष संघाला उपविजेतपद मिळाले.

पुरुष संघातील खेळाडू धनंजय जाधव, आदित्य अनगळ, गिरीश जकाते, प्रथमकुमार शिंदे, विपुल येडेकर, अथर्व करणाळे, श्रेयस तांबवेकर, प्रणव रावळ, साहिल गुजर, ओम जवनजाळ, श्रीधर पवार हे होते.

तसेच महिला संघाने फॉइल क्रीडा प्रकारात कांस्यपदक पटकावले. महिला संघातील विजेते खेळाडू असे : ज्योती सुतार, अनन्या जोशी, तनवी कुराडे, अमृता तराळ. डॉ. राहुल मगदूम, प्रफुल धुमाळ यांनी प्रशिक्षक आणि मार्गदर्शक म्हणून काम पाहिले.